# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

गो.वि./म.वि. वि. वि. /3650 /२०२२ दिनांक:21/10/2022

## परिपत्रक

विषय :– अशासकिय अनुदानित महाविद्यालयातील दिनांक ०१/१०/२०१७ अखेरचा शिक्षक व शिक्षकेत्तर पदांचा आढावाबाबत.

संदर्भ :– महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्रमांक पदभ/११२१/प्र. क्र. १० /म. वि. –१/१२५२६ दिनांक १२ ऑक्टोंबर २०२२

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, दिनांक १२ नोव्हेंबर २०२१ च्या शासन निर्णयानुसार अशासकिय अनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अशासकिय अनुदानित महाविद्यालयांना कार्यवाही घेण्याबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहे. तथापी संदर्भीय पत्रान्वये दिनांक ३१/१०/२०२२ पर्यंत आवश्यक सर्व कागदपत्रासह पदभरतीकरिता ना–हरकत प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सादर करावयाचे आहेत. जी महाविद्यालये उक्त कालावधीत प्रस्ताव सादर करणार नाहीत ते संबंधित महाविद्यालय पदभरतीसाठी ना–हरकत प्रमाणपत्र मागणीकरिता इच्छुक नसल्याचे ग्राहय धरण्यात येऊन संबंधित महाविद्यालयास पदभरतीसाठी अनुज्ञेय करण्यात आलेली पदे, पदभरतीसाठी मागणी केलेल्या अन्य महाविद्यालये/संस्थांना वर्ग करण्याबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल असे संदर्भीय पत्रात नमुद केलेले आहे.

करिता सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांनी संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यास्तव तातडीने कार्यवाही करावी.

सहपत्र :– संदर्भीय पत्र

मा. प्र–कुलगुरु यांच्या मान्यतेने

21/10/2

( देवेंद्र एम. झाडे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/ प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे. ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२१११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९

क्र.पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१ 12526 दिनांक- 12 OCT 2022

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय :अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दिनांक ०१.१०.२०१७ अखेरचा शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आढावा.**

**संदर्भ :** १.संचालनालयाचे समक्रमांक (१३४३५), दिनांक १६.११.२०२२ चे पत्र.
२.संचालनालयाचे समक्रमांक (१३६५५), दिनांक २३.११.२०२२ चे पत्र.
३.संचालनालयाचे समक्रमांक (४४३४), दिनांक २८.०४.२०२२ चे पत्र.
४.संचालनालयाचे समक्रमांक (४८०५), दिनांक ०५.०५.२०२२चे पत्र.
५.संचालनालयाचे समक्रमांक (४८०५), दिनांक ०५.०५.२०२२ चे पत्र.
६.संचालनालयाचे समक्रमांक(५४६५), दिनांक २०.०५.२०२२ चे पत्र.
७.संचालनालयाचे समक्रमांक (५९५७), दिनांक ०१.०६.२०२२ चे पत्र.
८.संचालनालयाचे समक्रमांक (६५०९), दिनांक १६.०६.२०२२ चे पत्र.
९.संचालनालयाचे समक्रमांक (६६१३), दिनांक २०.०६.२०२२ चे पत्र.
१०.संचालनालयाचे समक्रमांक (६७९३), दिनांक २४.०६.२०२२ चे पत्र.
११.संचालनालयाचे समक्रमांक(६८०४), दिनांक २४.०६.२०२२ चे पत्र.
१२.संचालनालयाचे समक्रमांक (१०१०३), दिनांक २७.०७.२०२२ चे पत्र.
१३.संचालनालयाचे समक्रमांक (१०८१४), दिनांक २२.०८.२०२२ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र आढावा-१५१३/प्र.क्र.१२५(भाग-८)/म.शि.५ दि. १२.११.२०२१ अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भीय पत्रान्वये वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी याबाबत पुनश्च: कळविण्यात येते की, **दिनांक ३१.१०.२०२२ पर्यंत** आवश्यक सर्व कागदपत्रांसह पदभरती ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव विहीत पध्दतीने निश्चितपणे प्राप्त होतील यास्तव कार्यवाही करावी अन्यथा संबधित महाविद्यालय पदभरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मागणीकरीता इच्छूक नसल्याचे ग्राहय धरण्यात येऊन संबधित महाविद्यालयास पदभरतीसाठी अनुज्ञेय करण्यात आलेली पदे, पदभरतीसाठी मागणी केलेल्या अन्य महाविद्यालये/ संस्थांना वर्ग करण्याबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल, ही बाब सर्व सबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

पदभरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मागणीकरीता कोणत्याही स्वरुपाचा विलंब होऊ नये यासाठी सर्व संबधितांना आपल्या स्तरावरून उचित निर्देश देण्यात यावेत.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत : १. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. प्राचार्य (संबंधित महाविद्यालये) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.